# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१. Email :nandedrdc@gmail.com

**जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३** **दिनांक. ०१.१०.२०२०**

**वाचा :-** १. साथरोग प्रतिबंधक कायदा, १८९७

२. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.

३. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३३, ३४,४१ व कलम ५१

४. मा. मुख्य सचिव, महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनवर्सन, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१ दि. ३०/०९/२०२०

**विषयः** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेच्या अनुषंगाने नांदेड जिल्हयात दिनांक ३१.१०.२०२० पर्यंत ताळेबंदीचा (Lockdown) कालावधी वाढविणे बाबत.

**आदेश**

ज्याअर्थी, शासन यांचेकडील आदेश क्र. डीएमयु / २०२० / सीआर.९२ / डीआयएसएम -१ दि. ३०/०९/२०२० अन्वये राज्यातील कोविड-१९ च्या अनुषंगाने दिलेल्या सुधारीत सुचना व पुन्हा सुरु मोहिमेंतर्गत आदेश परित केलेला असून सदर लॉकडाऊन कालावधी दि. ३१/१०/२०२० रोजीपर्यंत वाढविणेत आला आहे.

त्याअर्थी, मी डॉ.विपीन(भा.प्र.से.), जिल्हादंडाधिकारी, नांदेड, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ मधील तरतूदीनुसार, मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये, नांदेड जिल्हयात दि. ०१/१०/२०२० रोजीचे ००.०० वाजेपासून ते दिनांक ३१/१०/२०२० रोजीचे २४.०० वा. पर्यंत खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**परिशिष्ट -१**

**कोविड -१९ चे व्यवस्थापनाच्या अनुषंगाने खालील राष्ट्रीय निर्देशांचे पालन करणे बंधनकारक असून पालन न झालेस दंडात्मक/फौजदारी कारवाईस पात्र राहील.**

१. सार्वजनीक ठिकाणी, घराबाहेर व घरामध्ये जेथे लोकांचा वावर आहे तेथे असताना चेह-याचे तोंडावर व नाकावर **मास्कचा वापर न करणा-या व्यक्तींवर १०००/- रु दंड** आकारावा.

२. दुकानामध्ये प्रत्येक ग्राहकामध्ये किमान ६ फुट अंतर राहील याची खात्री करावी तसेच दुकानामध्ये एकावेळी ५ पेक्षा जास्त व्यक्तींना घेणेस मनाई करणेत येत आहे. ग्रामीण व शहरी दोन्ही भागात सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावी.

३. नांदेड जिल्हयातील प्रतिबंधित क्षेत्रामध्ये कोणतेही कार्यक्रम आयोजीत करणेस मनाई आहे.

तथापि, प्रतिबंधित क्षेत्र वगळून इतर क्षेत्रात खुले लॉन, विना वातानुकूलित मंगल कार्यालय/ हॉल सभागृह, घर व घराच्या परिसरात **५०** लोकांच्या (संपुर्ण कार्यक्रमासाठी) मर्यादेत लग्न संबंधित समारंभाचे आयोजन तसेच या कार्यालयाने वेळोवेळी दिलेले आदेश व अटी व शर्तीचे पालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहील. अंत्यविधी यासारख्या कार्यक्रमास **२०** पर्यंत व्यक्तींना सामाजिक अंतर ठेऊन हजर राहणेस परवानगी राहील.

४. नांदेड जिल्हयातील कोणत्याही सार्वजनिक अथवा ज्या ठिकाणी लोकांचा वावर जास्त प्रमाणात आहे अशा खाजगी जागेच्या ठिकाणी थूंकणेस मनाई असून, थुंकल्यास १०००/- रु दंड आकारावा.

५. सार्वजनिक ठिकाणी दारू, पान, गुटखा /तंबाखु इत्यादी सेवन करणेस मनाई करणेत येत आहे.

**कामाच्या ठिकाणी खालील अतिरिक्त निर्देशांचे पालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहील.**

६. शक्य असेल त्या ठिकाणी घरातुन काम करण्यास प्राधान्य दयावे.

७. कामाच्या आणि व्यावसायाच्या वेळा या कार्यालयामध्ये, कामाच्या ठिकाणी मार्केटमध्ये, औद्योगिक तसेच व्यावसायीक आस्थापनेमध्ये गर्दी होणार नाही, अशा पद्धतीने विभागून दयाव्यात. THERMAL

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१,  Email :nandedrdc@gmail.com

SCANNING, हॅंडवॉश, सॅनिटायझर, याची ENTRY POINT व EXIT POINT वर व्यवस्था करावी.

८. कामाच्या ठिकाणी, सार्वजनिक उपयोगाच्या जागा व सामान्य माणसाच्या वापरात येणाऱ्या सर्व जागा व वस्तू यांचे वेळोवेळी सॅनिटायझेशन करणेत यावे.

९. औद्योगिक व व्यावसायिक आस्थापना यांनी त्यांचे कामगारामध्ये, कामाची पाळी बदलणेचे वेळी, जेवणाचे व इतर सुट्टीचे वेळी, कामावर येताना व कामावरुन सुटताना शारिरीक अंतर पाळणे बंधनकारक आहे.

## परिशिष्ट- २

**१) Containment Zones प्रतिबंधीत क्षेत्र ः-**

I) प्रतिबंधीत क्षेत्र हे दिनांक १९.०५.२०२० व दि.२१.०५.२०२० च्या आदेशानुसार जिल्हयामध्ये तयार करण्यात येत असलेले कन्टेमेंट झोन हे पुढील आदेशापर्यंत कायम राहतील.

II) केंद्र शासनाने व राज्यशासनाने पुर्वी दिलेल्या सूचना जशास तसे लागू राहतील.

**२) नांदेड जिल्हा कार्यक्षेत्रात खालील बाबींना मनाई करणेत येत आहेत (प्रतिबंधीत /बंद क्षेत्र)**

I. सर्व शाळा, महाविदयालये, शैक्षणिक संस्था, प्रशिक्षण संस्था, कोचिंग इंस्टीटयुट हे ३१ ऑक्टोंबर २०२० पर्यंत बंद राहतील. तथापि, ऑनलाईन/ दुरस्थ शिक्षणास परवानगी राहील.

II. चित्रपट गृहे, जलतरण तलाव, करमणूक, उदयाने, थिएटर, बार, सभागृह, असेंबली हॉल यासारख्या इतर सर्व जागा बंद राहतील.

III. MHA ने परवानगी दिलेल्या व्यतीरिक्त आंतरराष्ट्रीय वाहतुक.

IV. सर्व सामाजिक, राजकिय, क्रिडा, मनोरंजन, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम व इतर मेळावे तसेच मोठया संख्येने लोक जमा होणारे कार्यक्रम, परिषदा बंद राहतील.

३) या आदेशापुर्वी सर्व अत्यावश्यक सेवा पुरविणारे दुकाने आस्थापना यांना लागू करण्यात आलेले आदेश जशास तसे लागू राहतील. **(सकाळी ९.०० ते सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत चालू राहतील.) मेडीकल/औषधाची दुकाने पुर्ण वेळ चालू ठेवण्यास परवानगी राहील.**

४) यापुर्वी वेळवेळी परवानगी दिलेल्या बाबी/क्षेत्रे पुर्ववत सुरु राहतील आणि यापुर्वी दिलेले आदेश सदर आदेशास सलग्न राहतील आणि सदरचे आदेश दिनांक ३१ ऑक्टोबंर २०२० पर्यंत कायम राहतील.

५) हॉटेल्स / फुड कोर्टस /रेस्टॉरन्टस् आणि बार दिनांक ०५ ऑक्टोबर २०२० पासून आस्थापनेच्या क्षमतेच्या ५० टक्के क्षमतेसह सुरू राहतील. सदर आस्थापना सुरु करण्यासाठी घ्याावयाच्या आवश्यक दक्षतेबाबत पर्यटनविभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतील.

६) ऑक्सीजन उत्पादन व वाहतुक करणा-या वाहनांच्या हालचालीस राज्यात व राज्र्ााबाहेर कोणत्याही प्रकारचे वेळेचे बंधन असणार नाही.

७) राज्य व केंद्र शासनाने वेळवेळी निर्गमित केलेले कोव्हीड १९ बाबतच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनाचा वापर करून राज्यातील रेल्वे सेवा सुरू करण्यात येत आहे.

८) यापुर्वी परवानगी देण्यात आलेल्या क्रिया/बाबी नेमूण दिलेल्या आदर्श कार्य प्रणाली सूचनेप्रमाणे (SOP) चालू राहतील.

९) . जिल्हयात सार्वजनिक ठिकाणी, लोकांचा वावर असणाऱ्या तसेच वाहतुकीच्या साधनामध्ये मास्क चा वापर करणे,सॅनिटायझरचा वापर, शारिरीक अंतर पाळणे बंधनकारक आहे.

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधीतांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधीतांचे विरुध्द मा. मुख्य सचिव, महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनवर्सन, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.डीएमयु /२०२० /सीआर.९२ /डीआयएसएम-१ दि. ३०/०९/२०२० मधील

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com


Annexure III मध्ये नमूद केलेप्रामणे आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, व भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ नुसार तसेच भारतीय साथरोग अधिनियम १८९७ अन्वये दंडनीय / कायदेशीर कारवाई संबंधित पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी करावी.

सदरचा आदेश आज दि. ०१/१०/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

स्वाक्षरित/-
**(डॉ.विपीन इटनकर)**भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

१. मा. अपर मुख्य सचिव,गृह विभाग (विशेष) मंत्रालय,मुंबई.
२. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

**प्रतिलीपी – आवश्यकत्या कार्यवाहीस्तव**

३. पोलीस अधिक्षक नांदेड.
४. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
६. सर्व उपविभागीय दंडाधिकारी नांदेड जिल्हा
७. सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
८. सर्व तालुका दंडाधिकारी नांदेड जिल्हा
९. सर्व संबंधित विभाग प्रमुख यांना अनुपालनास्तव
१०.जिल्हा माहीती अधिकारी नांदेड यांना व्यापक प्रसिध्दीस्तव.

**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**

PB PC CORONA